# सुखकर्ता दुःखहर्ता

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची।
सर्वांगी सुंदर उटी शेंदूराची।
कंठी झळके माळ मुक्ताफळाची।।

जय देव जय देव जय मंगल मूर्ती।
दर्शनमात्रे मन कामनापुर्ती।।
जय देव जय देव

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा
चंदनाची ऊटी कुंकुम केशरा।
हीरे जडित मुकुट शोभतो बरा।
रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया।।
जय देव जय देव

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुण्ड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ।
जय देव जय देव

# दत्तगुरु आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।
नेती नेती शब्द न ये अनुमाना ।
सुरवर मुनिजन योगे समाधी न ये ध्यान ॥
जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता ।
आरति ओवाळीता हरली भवचिन्ता ॥
जय देव जय देव

सबाह्य अभ्यंतरी तू एक् दत्त ।
अभाग्यासी कैसी नकळे ही मात ।
पराही परतली कैसा हा हेत
जन्म मरणाचा पुरलासे अंत ॥
जय देव जय देव

दत्त येऊनीया उभा ठाकला ।
सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ।
प्रसन्न होउनीया आशीर्वाद दिधला ।
जन्मा मरणाचा फेरा चुकवीला ।।
जय देव जय देव

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान ।
हरपले मन झाले उन्मन ।
मी तू पणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनी श्री दत्त ध्यान ।।
जय देव जय देव

# स्वामी समर्थ आरती

जय देव, जय देव, जय श्री स्वामी समर्था।
जय श्री स्वामी समर्था। आरती ओवाळू चरणी
ठेउनिया माथा ।।धृ।।
छेलि खेडे ग्रामी तु अवतरलासी,
राया अवतरलासी। जगद्उध्धारासाठी राया
तु फिरसी। भक्तवत्सल खरा तु एक होसी,
राया एक होसी। म्हणुनी शरण आलो
म्हणुनी शरण आलो तव चरणासी
जय देव, जय देव ।।१।।
जय श्री स्वामी समर्था। जय श्री स्वामी समर्था।
आरती ओवाळू, आरती ओवाळू, चरणी ठेउनिया माथा
त्रैगुण-परब्रम्ह तुझा अवतार, तुझा अवतार।
त्याची काय वर्णु , त्याची काय वर्णु लिला पामर।
शेशादिक क्षीणले नलगे त्या पार, नलगे त्या पार।
तेथे जडमुढ कैसा, तेथे जडमुढ कैसा
करु मी विस्तार। जय देव, जय देव ।।२।।
जय श्री स्वामी समर्था। जय श्री स्वामी समर्था।
आरती ओवाळू, आरती ओवाळू, चरणी ठेउनिया माथा

देवाधिदेवा तु स्वामी राया, तु स्वामी राया।
निरजन मुनीजन ध्याती, निरजन मुनीजन ध्याती
भावे तव पाया। तुझसी अर्पण केली आपुली
ही काया, आपुली ही काया।
शरणागता तारी, शरणागता तारी
तु स्वामी राया। जय देव, जय देव ।।३।।
जय श्री स्वामी समर्था। जय श्री स्वामी समर्था।
आरती ओवाळू, आरती ओवाळू, चरणी ठेउनिया माथा
अघटीत लिला करूनी जडमुढ उध्दारिले,
जडमुढ उध्दारिले। किर्ती एकूनी कानी,
किर्ती एकूनी कानी चरणी मी लोळे।
चरण प्रसाद मोठा मज हे अनुभवले,
मज हे अनुभवले। तुझ्या सुता नलगे,
तुझ्या सुता नलगे तव चरणा वेगळे।
जय देव, जय देव
जय श्री स्वामी समर्था। जय श्री स्वामी समर्था।
आरती ओवाळू, आरती ओवाळू, चरणी ठेउनिया माथा

# पंच प्राण हे आतुर

पंचप्राण हे आतुर झाले, करण्या तव आरती ।
स्वामी करण्या तव आरती ।
सगुण रुपाने येऊन स्वामी,
स्वीकारा आरती ।। धृ. ।।
हरि हर संगे ब्रह्मदेवही खेळे तव बाळी ।
स्वामी खेळे तव बाळी ।। पुनव हासते प्रसन्नतेने,
मुखचंद्राचे वरी। लाजविती रवि -तेजाला तव
नयनांच्या ज्योति। स्वामी नयनांच्या ज्योती ।।१।।

सगुण रुपाने येऊन स्वामी,
स्वीकारा आरती पुण्यप्रद तव नाम असावे,
सदैव या ओठी। स्वामी सदैव या ओठी।
श्वासासंगे स्पंदन व्हावे, तुझेच जगजेठी।
अगाध महिमा अगाध आहे स्वामी तव
शक्ती आहे स्वामी तव शक्ती ।। २ ।।

सगुण रुपाने येऊन स्वामी, स्वीकारा आरती
धर्माचरणे पावन व्हावे, सदा असो सन्मती।
स्वामी सदा असो सन्मती ।
सत्कर्मांचा यज्ञ घडावा, झिजवुन ही यष्टी ।
सन्मार्गाने सदैव न्यावे, घेऊनि, मज हाती।
स्वामी घेऊनि मज हाती ।।३ ।।

सगुण रुपाने येऊन स्वामी, स्वीकारा आरती
अहंपणाचा लोभ करुनिया, कृतार्थ जीवन करा ।
स्वामी कृतार्थ जीवन करा ।
पावन करुनि घ्यावे मजला,
तेजोमय भास्करा अल्पचि भिक्षा घालूनि स्वामी,
न्यावे मज संगती ।
स्वामी न्यावे मज संगती ।। ४ ।।
सगुण रुपाने येऊन स्वामी,
स्वीकारा आरती

# घालीन लोटांगण

घालीन लोटांगण वंदीन चरण।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन।
भावे ओवाळिन म्हणे नामा ॥

त्वमेव माता पिता त्वमेव।
त्वमेव बन्धुः सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव।
त्वमेव सर्वं मम देवदेव ॥

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा।
बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात्।
करोमि यद्यत् सकलं परस्मै।
नारायणायेति समर्पयामि ॥

अच्युतं केशवं राम नारायणम् ।
कृष्णदामोदरं वासुदेवं भजे
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम् ।
जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे

विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 10 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 20 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 30 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 40 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 50 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 60 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 70 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ||80 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 90 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 100 ||
विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल || 108 ||

# श्री स्वामी समर्थ तारक मंत्र

निशंक होई रे मना, निर्भय होई रे मना । प्रचंड स्वामीबळ पाठीशी,
नित्य आहे रे मना ।
अतर्क्य अवधूत हे स्मर्तुगामी, अशक्य ही शक्य करतील स्वामी ।।१।।

जिथे स्वामीचरण तिथे न्युन्य काय, स्वये भक्त प्रारब्ध घडवी ही माय।
आज्ञेवीना काळ ही ना नेई त्याला, परलोकी ही ना भीती तयाला
अशक्य ही शक्य करतील स्वामी ।।२।।

उगाची भितोसी भय हे पळु दे, वसे अंतरी ही स्वामीशक्ति कळु दे ।
जगी जन्म मृत्यु असे खेळ ज्यांचा, नको घाबरू तू असे बाळ त्यांचा
अशक्य ही शक्य करतील स्वामी ।।३।।

खरा होई जागा श्रद्धेसहित, कसा होसी त्याविण तू स्वामिभक्त ।
आठव! कितीदा दिली त्यांनीच साथ, नको डगमगु स्वामी देतील हात
अशक्य ही शक्य करतील स्वामी ।।४।।
विभूति नमननाम ध्यानार्दी तीर्थ, स्वामीच या पंचामृतात।
हे तीर्थ घेइ आठवी रे प्रचिती,ना सोडती तया,
जया स्वामी घेती हाती, अशक्य ही शक्य करतील स्वामी ।।५।।

**अनंतकोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय || 3 ||**